RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# डॉ. रमाकान्त शुक्लांच्या काव्यांतून प्रकट होणारी राष्ट्रनिष्ठा

**प्रा. डॉ. ऊर्मिला अराणके**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा आणि
रयत इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट, सातारा.

**गोषवारा**

*डॉ. रमाकान्त शुक्लांच्या 'भाति मे भारतम्' या शतककाव्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लिहिलेल्या रौति ते भारतम् , राष्ट्रदेवते, अहं स्वतंत्रता भणामि, वन्दनीयास्ते, जय भारतभूमे, स्वतंत्रताया: स्वर्णजयन्ती, वदत नेतारो मनाक् वगैरे कवितांच्या अनुषंगाने त्यांच्या राष्ट्रनिष्ठेचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे. भारतमातेच्या सुपुत्रांचे संकीर्तन, मातृभूमीचा महिमा वर्णन करण्यातच आपल्या कवितेची सार्थकता आहे, असे मानणाऱ्या कविवर्य शुक्लांची भारतभूमी विषयीची सुरुवातीला थोडी अंध वाटणारी श्रद्धा नंतर नंतर अधिकाधिक डोळस मात्र तरीही अत्यंत प्रखर होत गेल्याचे या शोधनिबंधातून सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे.*

**बीजशब्द**
भारत, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीयभावना.

**संशोधन पद्धती**

डॉ. शुक्लांच्या कवितांचे राष्ट्रनिष्ठेच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यासाठी त्यांच्या कवितांचा अभ्यास करताना विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**प्रस्तावना**

अर्वाचीन संस्कृतम् या त्रैमासिकाचे संपादक, दिल्ली विश्वविद्यालयातील हिंदीचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रमाकान्त शुक्लांचे नाव घेताच संस्कृत रसिकांना आठवते ते 'भाति मे भारतम्' हे काव्य. आतापर्यंत अनेक संमेलनातून तसेच दूरदर्शनवरून देखील आपल्या खड्या आवाजात ते गाऊन त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलेले आहे.त्यांचे काव्यगायन म्हणजे देशभक्त कवीचा प्रेरक स्वर आहे. त्यांच्या कवितेतून भारताच्या गौरवपूर्ण उज्ज्वल भूतकाळाविषयी आत्यंतिक अभिमान, साधनसामग्रीने संपन्न वर्तमानाविषयी आनंद तर मंगलमय भविष्याविषयीची उत्कट कामना व्यक्त होते. आजपर्यंत त्यांच्या या कवितेवर अनेकांनी लिहिले आहे. या लेखात शुक्लांच्या या कवितेच्या पार्श्वभूमीवर नंतर लिहिलेल्या विशेषत: रौति ते भारतम् व अन्य कवितांमधील त्यांच्या राष्ट्रनिष्ठ भावनेचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

डॉ. शुक्लांचा काव्यहेतू : आपल्या कवितेने शिल्पकार, कामकरी, उन्हापावसात कष्टणारा जणू तपस्वी असा अन्नदाता शेतकरी, परोपकारी, सत्यव्रती, विद्वान, गुरुजन, वैज्ञानिक यांचे गुणगान करावे. तसेच ज्यांनी आपले यर्वस्व स्वदेशासाठी वेचले त्या हुतात्म्यांचे नित्य गान करावे. स्वतंत्रतायज्ञाची दीक्षा घेऊन ज्यांनी दीर्घकाळ कारावास सोसला, मरणाला कवटाळले, त्या नरोत्तमांचे गुणगान आपल्या कवितेने नित्य करावे. आज देशाच्या उद्धारासाठी, उत्कर्षासाठी झटणाऱ्यांचे, देशरक्षणासाठी रात्रंदिवस देशाच्या सीमांवर लढणाऱ्या जवानांचे, आपल्या कर्तृत्वाने देशाचे नाव विश्वविख्यात करणाऱ्या भारतमातेच्या सुपुत्रांचे संकीर्तन करावे आणि आपल्या मातृभूमीचा महिमा सांगण्यासाठीच केवळ

आपल्या कवितेने स्फुरावे. त्यातच तिची सार्थकता आहे, अशी कवीची धारणा आहे.(शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९९४ पृ. ४७ ते ५०)

**भाति मे भारतम्**

कविवर्य रमाकान्त शुक्लांचे 'भाति मे भारतम्' हे सुप्रसिद्ध शतककाव्य आहे. याला स्तोत्रकाव्य, भावकाव्य किंवा मालाकाव्य असेही म्हणता येईल. समर्पणाच्या सुरुवातीपासून कवीची उत्कट राष्ट्रभक्ती प्रत्ययाला येते. कवी म्हणतो, भारतच माझा मुख्य आधार आहे.मी सतत भारताचेच स्मरण करतो. भारतामुळेच माझे जीवन आहे आणि म्हणूनच माझे सर्व क्रियाकलाप मी भारतालाच अर्पण करतो.

" भारतं वर्तते मे परं सम्बलं
भारतं नित्यमेव स्मरामि प्रियम् ।
भारतेनास्ति मे जीवनं जीवनम्
भारतायार्पितं मे ऽखिलं चेष्टितम्।।''(शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : समर्पणम् )

एवढेच नव्हे तर कवी भारतामध्येच विश्वेश्वराला पाहतो. कवीच्या मते धरणीमातेचा शृंगार म्हणजे भारतदेश आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : पद्य १ ) विश्वबंधुत्वाचा उद्घोष करणारा, वसुधैव कुटुम्बकम् वृत्तीचा प्रसार करणारा, विश्वशांतीसाठी प्रयत्नशील असा आपला भारत या भूतलावर तेजाने तळपत आहे, याचा कवीला अभिमान वाटतो. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : पद्य १०२ ) कवीच्या मते अहिंसेच्या जोरावर हिंसेवर विजय मिळविणारे, शस्त्राविना, रक्तपाताविना क्रांती घडविण्यास समर्थ असे भारतराष्ट्र आहे. वंचक, तस्कर, देशद्रोही वगैरेंनी या देशाला संपविण्याचे अनेकवार प्रयत्न केले, पण त्यांना त्यात यश मिळाले नाही. कारण आमचा देश अजरामर, शाश्वत आहे अशी कवीची दृढ धारणा आहे. आपला देश संपूर्ण विश्वाला शांततेचे, सामंजस्याचे, बंधुत्वाचे धडे देतो. आपल्या आध्यात्मिक संदेशातून सर्व जगाला सुखी करू पाहतो याचा कवीला अभिमान वाटतो. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : पद्ये ८८ ते ९६ )

कवीने या काव्यात भारतातल्या केवळ उत्कृष्टच गोष्टींचे वर्णन केलेले आहे. देशाच्या ज्या विलोभनीय बाजू आहेत त्याच वाचकांसमोर ठेवल्या आहेत. वास्तविक आपल्या देशात अनेक वाईट गोष्टी, चालीरीती देखील आहेत. पण कवीने त्यांचा उल्लेखही केलेला नाही. आत्यंतिक श्रद्धेने कदाचित थोड्या अंधश्रद्धेनेही असेल, पण कवी आपल्या देशातील अवगुणांकडे कानाडोळा करीत आहे. पण आपल्या या कृतीचे समर्थन करतो. जरी काही लोकांना भारतामध्ये अनेक दोष आहेत असे वाटत असले तरी ते असोत . कवीला ते दृष्टिआड करावेसे वाटतात. नेहमी जे चांगले, उत्तम तेच प्रशंसावे अशी कवीची धारणा आहे.

'सन्तु दोषा अनेके ऽ त्र कैश्चिन्मता:
किन्तु नाहं प्रपश्यामि तान् मन्दधी: ।'(शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : पद्ये १०७ )

या भावकाव्यातून कवीने देशवासीयांच्या मनात राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्रमुग्ध करणारे हे काव्य भारताचे गौरवगान आहे.

**रौति ते भारतम्**

अनेक अभावांनी,दोषांनी युक्त असलेला भारत कवीला दिसत नाही की काय, अशी शंका यावी इतपत भारताचे उदात्तीकरण 'भाति मे भारतम्' या काव्यात कवीने केलेले आहे. या आपल्या मातृभूविषयक हळव्या भावनांची कोणी टर उडवू नये, याविचाराने शुक्लांनी 'रौति ते भारतम्' हे काव्य लिहिले आहे. यामध्ये कवीने कल्पना केली आहे की, कोणीतरी कवीला विचारीत आहे,की अनेक अभावांनी युक्त असलेला तुझा भारत रडतो आहे ते तुला दिसत नाही काय ? देशातील दारिद्र्य, रोगराई, अनाचार, भ्रष्टाचार, हिंसा, दंगली, विश्वासघात, देशविघातक शक्ती, संप, मोर्चे, युवकांचे

मादक पदार्थांचे सेवन वगैरे वाईट गोष्टींचे वर्णन केले आहे. विश्वबंधुत्वाचा संदेश देणाऱ्या भारतातच विद्वेष आणि हिंसाचाराची चढती कमान पाहून भारत खरोखरीच रडतो आहे असे वाटते.इतक्या सगळ्या वाईट गोष्टी असूनही कवीला मात्र भारत प्रियच आहे. कारण कवीची ही प्रामाणिक भावना आहे की, वाईट गोष्टी सोडून देऊन चांगल्या संचिताचेच संकीर्तन करावे.कवी म्हणतो–

‘दोषवर्जं मया सद्गुणा: सञ्चिता–
स्तेन प्रोक्तं मया भाति मे भारतम् ।’ (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : एप्रिल १९८७ पृ. ५८)

या कवितेतील शेवटची दोन पद्ये मननीय आहेत. कवीच्या मते नुसते दोष सांगून किंवा आक्रोश करून दोष नाहीसे होत नसतात. देशातील दोष जर नष्ट करावयाचे असतील तर आपण सर्वांनी नेहमी सत्क्रियाच केल्या पाहिजेत. तरच आपला भारत प्रसन्नतेने सुशोभित दिसेल. त्यासाठी इथे लोभी नायक आणि कर्तव्यशून्य प्रजा मुळीच असता कामा नये. आपण सर्वांनी मिळून देशसेवा केली पाहिजे म्हणजे आपल देश पुन्हा स्वतेजाने उजळून निघेल. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : एप्रिल पृ.५८)कवीला आपल्या देशाच्या उणिवांचीही जाणीव आहे. तोही उघड्या डोळ्यांनी मात्र अंतर्मुख होऊन देशाची होत असलेली अवनती पाहात आहे. पण म्हणून केवळ सतत त्यांचीच चर्चा करून ते दूर होऊ शकत नाहीत याचीही कवीला जाणीव आहे. उलटपक्षी आपल्या उज्ज्वल परंपरेचा सतत उल्लेख करण्याने, आपल्यातल्या चांगल्या गोष्टी वारंवार सांगितल्याने निदान तसे वागण्याची प्रेरणा तरी मिळते.पुन्हा तो उत्कर्षाचा सुवर्णकाळ निर्माण करण्याची आकांक्षा उत्पन्न होते.

**जय भारतभूमे**

‘भाति मे भारतम्’ प्रमाणेच आत्यंतिक श्रद्धेने मातृभूमीचे स्तवन करणारा हा विविध कवितांचा काव्यसंग्रह आहे. भारतमातेचे विजयगीत, गौरवगान हा एकच त्यांचा प्रतिपाद्य विषय आहे.भारताच्या अलौकिक सद्गुणांचे वर्णन करताना कविप्रतिभा फुलून येते. विश्वामध्ये पूर्वक्षितिजावरील सूर्याप्रमाणे भारत प्रकाशमान आहे, असे कवीला वाटते. कवीची अशी ठाम धारणा आहे की, आमची भारतभूमी जागृतिशीला, क्रान्तिविलासा, कांतियुता, सन्मानयुता, विद्वत्तोषिणी, मानसपोषिणी, शान्तियुता, अमितकार्ययुता, समरविरागिणी, सत्य–अहिंसा–परहित–करुणा,प्रीतिधरा, हरिनामामृततृप्ता, प्रेय–श्रेय–साधनिका, ब्रह्मक्षात्रप्रभापुरा अशी ही त्यागभूमी आहे.या संग्रहातील सवर्च कवितांमधून कवीची राष्ट्रभक्ती भोळ्या वारकऱ्याच्या भक्तिभावाप्रमाणे आहे.

**इतर राष्ट्रभावोत्तेजक कविता**

आपल्या भारतमातेची, राष्ट्रदेवतेची अचर्ना करण्याची शुक्लांची तळमख आहे,मात्र ही अचर्ना कशी करावी असाही त्यांना प्रश्न पडतो. राष्ट्रदेवते या कवितेतून त्यांच्या भावुक मनाची ही तळमळ स्पष्ट होते. राष्ट्राच्या सद्य: स्थितीची भयाण वास्तवता यात प्रतिबिंबित होते. उग्रता, हिंसा, आक्रोश, चीत्कार, ऐकायला येत असता राष्ट्रदेवतेचे स्तवन कसे करावे हे कवीला समजत नाही. (शुक्ल: अवार्चीन संस्कृतम् : १९८६: पृ.९२ )

‘‘ हे राष्ट्रदेवते, इथल्या जनतेची मुखकमले आनंदाने प्रफुल्लित नसता तुला फुले कशी वाहू ? इथला सगळा कारभार विद्वेषरूपी विषाने वेढलेला असता चंदनाचा लेप कसा लावू ? चिखलाने लडबडलेले, घाणीचे साम्राज्य असता तुला सुगंध कोठून देऊ? इथल्या लोकांची मने सौमनस्याने गुंफलेली नसताना सुमनांची माला कशी अपर्ण करू? द्वेषाचा वणवा शांत होत नाही तर तुला कोणत्या दीपाने ओवाळू ? सवर्जण भुकेने व्याकुळ झाले असता नैवेद्य कसला अपर्ण करू ? निधर्न अधिक निधर्न होत असता तुला दक्षिणा कशी देऊ? अशा प्रकारचे अनेक प्रश्न त्यांच्या मनात गोधळ निमार्ण करतात.’’पण हे सवर्सांगून झाल्यावर हा पापभीरू कवी आपण आपल्या देवतेला दुखावले या कल्पनेने अधिकच दु:खी होतो आणि पश्चात्ताप करू लागतो. मोकळ्या मनाने, निमर्ळ अंत:करणाने राष्ट्रदेवतेची क्षमायाचना करतो. (शुक्ल: अवार्चीन संस्कृतम् : १९८६: पृ. ९२ )

'अहं स्वतन्त्रतां भणामि' या कवितेत डॉ. शुक्लांनी स्वतंत्र भारतातील अनेक कटू सत्ये परखडपणे सांगून त्याविषयी खेद व्यक्त केला आहे.पण तरीही भारताच्या उज्ज्वल भविष्याविषयी ते खूपच आशावादी आहेत. प्रत्यक्ष स्वतंत्र देवताच आपल्या वेदना या कवितेतून सांगत आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९८३: पृ. ४० ) तर 'स्वतन्त्रताया: स्वर्णजयन्ती' या कवितेत स्वातंत्र्याच्या सुवर्णजयंतीच्या निमित्ताने कवीने स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या सर्व रणवीरांचे, देशभक्तांचे सादर स्मरण केले आहे. आणि भारतीयांना विवश करणाऱ्या देशभक्षकांच्या दुष्कृत्यांविषयी दु:खही व्यक्त केले आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९९८: पृ. १ ) 'लोकतन्त्रेऽस्मिन् 'या कवितेत देखील भारतातील लोकशाहीची चाललेली विटंबना चित्रित करून वाचकांना अंतर्मुख केले आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९९८: पृ. ३७ ) 'वदत नेतारो मनाक् 'या कवितेत विवादास्पद प्रसंगांचे राजकारण करणाऱ्या आजच्या स्वार्थी नेत्यांना त्यांच्यामुळे देशामध्ये निर्माण झालेल्या दुर्दशेची स्पष्ट जाणीव करून दिली आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९९०: पृ. १८९ ते १९२ )

वाचकांना अंतर्मुख करून आत्मपरीक्षणास प्रवृत्त करणारी 'वन्दनीयास्ते' ही कविता आहे. समाजाचे प्रबोधन करण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे. या कवितेत वन्दनीयास्ते या शब्दाची तीन अर्थांनी रचना केलेली आहे. १. वन्दनीयाआस्ते। – वंदनीय आहे.२. वन्दनीया: ते ।– ते वंदनीय आहेत. वन्दनीया: ते (तव)? तुम्हाला ती वंदनीय आहे का? एकीकडे भारतमातेच्या सगळ्या चांगल्या गोष्टी सांगून ती कशी वंदनीय आहे ते सांगितले आहे. तर दुसरीकडे इथली दुरवस्था, तिच्या धवल कीर्तीला काळीमा फासणारे तिचे कुपुत्र पाहून, देशाच्या स्वातंत्र्यदिनावर, गणतंत्रदिनावर बहिष्कार टाकणाऱ्यांना भारतीय तरी कसे म्हणावे असे कवीला वाटते.सर्व बाजूंनी जणू धगधगत्या वणव्यात देश वेढला असता आपण स्तब्ध राहणे योग्य आहे का ही स्तब्धता वंदनीय वाटते का तुम्हाला अगदी पोटतिडकीने कवी वाचकांना प्रश्न विचारीत आहे. (शुक्ल: अर्वाचीन संस्कृतम् : १९९३: पृ. ५ ते ८ )

**निष्कर्ष**

या सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की,

१. कविवर्य रमाकान्त शुक्लांची काव्यप्रतिभा मातृभूमीविषयीची नितांत प्रीती, आपल्या संस्कृती व परंपरांविषयीचा अभिमान, थोर विभूतींविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठीच कार्यरत झालेली दिसते.

२. डॉ. शुक्लांची राष्ट्रभक्ती प्रारंभी भोळ्या वारकऱ्याप्रमाणे असली, कोणाला थोडी अंधश्रद्ध वाटली तरी सदसद्विवेकी, जनजागरणाचे सामर्थ्य असलेली, तेजस्वी, परखड, प्रखर राष्ट्रनिष्ठेत परिवर्तित झालेली दिसते.

३. डॉ. शुक्लांचे काव्य वाचकांच्या मनातही राष्ट्रनिष्ठा जागृत करण्यास समर्थ तर आहेच, पण त्याचबरोबर देशाच्या सद्यस्थितीकडे डोळसपणाने बघण्याची दृष्टीही निर्माण करते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. अर्वाचीन संस्कृतम् : संपादक डॉ. शुक्ल रमाकान्त : देववाणी प्रकाशन, नवी दिल्ली: १९८३ पासून १९९८ पर्यंतच्या अंकाचे संग्रह.